ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-I, Issue-VI April 2013

# आदिवासी विकास योजना : आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक विकासाचा मार्ग

**श्री. कापडी ए. एस.**
**पीएच. डी. संशोधक विद्यार्थी**
**के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक**

**मार्गदर्शक**
**श्रीमती डॉ. विद्या सोहनी**
**बिटको कॉलेज, नाशिकरोड**

***सारांश :***

*भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्वानुसार राज्यातील दुर्बल घटक विशेषतः अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी विशेष काळजी घ्यावी आणि त्यांचे सामाजिक अन्याय व इतर पिळवणूकींपासुन संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनावर टाकण्यात आली आहे. भारतीय संविधानातील या मार्गदर्शक तत्वास अनुसरुन पंचवर्षिक योजनांमध्ये मागासवर्गीयांच्या शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमावर भर देण्यात आला आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभाग विविध विकास योजना राबवित आहे.*

मुख्य संज्ञा : आदिवासी विकास योजना

**प्रस्तावना :**

भारताला स्वतंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक विकासाठी आर्थिक नियोजनाचा मार्ग अवलंबिण्यात आला व १९५१ मध्ये पहिली पंचवार्षिक योजना आखण्यात आली. परंतु सुरवातीच्या ३० वर्षात सरकाराने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकडे पुर्णतः दुर्लक्ष केले. पुढे सरकारने आदिवासींकडे विशेष लक्ष पुरविण्यासाठी मंत्रालय पातळीवर १९७३ साली आदिवासी विकास विभागाची स्थापना करण्यात आली. तत्पुर्वी १९७२ सालापर्यंत आदिवासी कल्याण विभाग हा समाजकल्याण विभागातंर्गत कार्यरत होता. १९७२ साली महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली व पुढे १९७३ साली आदिवासी विकास विभाग स्वतंत्र करण्यात आला. परंतू काही काळ समाजकल्याण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली या विभागाचे काम चालु होते. सन १९७५-७६ साली राज्यात आदिवासी उपयोजना लागु करण्यात आली. त्यामुळे विकास कार्याची दिशा राहाता ती विकास योजना (Welfare Schemes to Development Schemes) अशी करण्यात आली. समुह विकासाबरोबर क्षेत्र विकास असे नियोजनाचे सुत्र ठरविण्यात आले. क्षेत्र विकास कार्यक्रमातुन आदिवासी भागातील साधन संपत्तीचा विकास व संवर्धन होईल व त्याचा फायदा पर्यायाने आजुबाजुच्या आदिवासी समुहांना होईल. आदिवासींचे जीवन ज्या साधनसंपत्तीवर, उदा जमीन, जंगल इ. वर अवलंबुन आहे. त्यांच्या विकास कार्यक्रमातुन आदिवासींना संपन्न साधन सामग्रीचा फायदा मिळेल अशा दृष्टीकोनाचा स्विकार करण्यात आला समुह विकासाच्या योजनांबरोबर क्षेत्र विकास कार्यक्रमावर १९७५-७६ पासुन विशेष भर देण्यात आला. यासाठी स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणेची गरज होती. त्यासाठी

आदिवासी विकास विभाग सहकारी आदिवासी विकास महामंडळ, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अशा राज्यपातळीवर वेगवेगळ्या कामासाठी प्रशासकीय यंत्रणा उभ्या करण्यात आल्या. त्यातुनच प्रादेशिक व जिल्हा कार्यालये निर्माण झाली व आदिवासी विकासाची स्वतंत्र प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात आली.

**महाराष्ट्र शासन व आदिवासी विकास योजना :**

महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ.कि.मी. एवढे असुन त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण महाराष्ट्र राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रफळाच्या १६.५ टक्के एवढे आहे. गेल्या चार दशकातील राज्याची लोकसंख्या व आदिवासी लोकसंख्या यांची तुलनात्मक आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| जनगणना वर्ष | राज्याची एकूण लोकसंख्या (लाखात) | राज्याची आदिवासी लोकसंख्या (लाखात) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १९७१ | ५०४.१२ | ३८.४१ | ७.६२ |
| १९८१ | ६२७.८४ | ५७.७२ | ९.१९ |
| १९९१ | ७८९.३७ | ७३.१८ | ९.२७ |
| २००१ | ९६८.७९ | ८५.१८ | ८.८५ |

संदर्भ - वार्षिक आदिवासी उपयोजना २००७-२००८

महाराष्ट्र राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. त्यात मुख्यत्वे भिल्ल गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकुर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यतः रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंडे (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसुचीत केलेल्या आहेत.

राज्यात एकूण ३५ जिल्हा आहेत. यांत धुळे, नंदुरबार, जळगांव, नाशिक व ठाणे (सह्याद्री प्रदेश) तसेच चंद्रपुर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपुर, अमरावती व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पुर्वेकडील वनाच्छादित जिल्हयामध्ये आदिवासींची संख्या अधिक आहेत.

१९७५-७६ या वर्षी भारत सरकारने निर्देश दिल्याप्रमाणे ज्या गावातील आदिवासींची संख्या एकूण लोकसंख्येच्या ५० टक्क्याहून अधिक असेल त्या गावांचा समावेश एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पामध्ये ( आयटीडीपी ) ( Intergrate Tribal Development Programme ) करण्यात आला. भारत सरकारने मान्यता दिलेले अशा प्रकारचे १६ प्रकल्प होते. नंतर ज्या गावामधील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्क्यापेक्षा किंचितशी कमी होती त्या गावांचा समावेशही अशा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रामध्ये करण्यात आला आणि अशी क्षेत्रे अतिरिक्त आदिवासी उपयोजना (एटीएसपी गट / प्रकल्प) म्हणून ओळखण्यात येऊ लागली. राज्य शासनाची मान्यता मिळालेली अशी ४ अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्र आहेत. कालांतराने विखूरलेल्या स्वरुपातील इतर क्षेत्रामधील आदिवासींची संख्या लक्षात घेऊन आणि त्या ठिकाणी चालविण्यात येणा-या शैक्षणिक संस्थांचा विचार करुन मुंबई,

औरंगाबाद आणि अकोला यासाठीही प्रकल्प मंजुर करण्यात आले. तसेच जव्हार-मोखाडा क्षेत्रातील आदिवासींची मृत्युची संख्या लक्षात घेऊन तसेच आरोग्य, पोषण आहार आणि सेवायोजनाकडे बारकाईने लक्ष देण्याच्या दृष्टीने ठाणे जिल्हयातील आदिवासी क्षेत्राची २ प्रकल्पाऐंवजी ३. प्रकल्पांमध्ये विभागाची करण्यात आली. अशा पध्दतीने सध्या एकूण प्रकल्प अधिका-यांची संख्या २४ आहे.

दरम्यानच्या काळात एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प क्षेत्रालगतच्या प्रदेशातही काही ठिकाणी आदिवासींची वस्ती असल्याचे सरकारच्या लक्षात आले म्हणून सुमारे १०,००० लोकवस्तीच्या दोनपेक्षा अधिक गावांमध्ये आदिवासींची संख्या ५० टक्क्याहून अधिक असेल तर अशा गावांचा समावेश सुधारीत क्षेत्र विकास खंडामध्ये (म्हाडा) करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. त्याचप्रमाणे एकूण ५,००० लोकवस्तीच्या दोन किंवा तीन गावांमध्ये ५० टक्क्याहून अधिक आदिवासींची संख्या असेल तर त्या गावांचा समावेश मिनीमाडा क्षेत्रामध्ये करण्यात यावा अशा सुचना आहेत. महाराष्ट्रामध्ये एकूण ४३ माडा क्षेत्रे आणि २४ मिनीमाडा क्षेत्रे आहेत.

२००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील एकूण आदिवासींपैकी सुमारे ४९ टक्के आदिवासी आयएडीपी, माडा आणि मिनीमाडा क्षेत्रात राहातात व उर्वरीत ५१ टक्के आदिवासी या क्षेत्राबाहेर राहातात.

आदिवासी विकास विभागाकडे सोपविलेल्या कामकाजामध्ये अधिक उत्तरदायी प्रशासन होण्याच्या दृष्टीने १९९२ मध्ये या विभागाची पुनर्रचना करण्यात आली. त्यानुसार राज्यात आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांचे अधिपत्याखाली अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, अमरावती व नागपुर असे चार अपर आयुक्त कार्यालये आहेत. तसेच २४ प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालये कार्यरत असुन त्यापैकी ११ एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अत्यंत संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले आहेत. त्यामध्ये नाशिक, कळवण, तळोदा, जव्हार, डहणू, धारणी, किनवट, पांढरकवडा, गडचिरोली, अहेरी व भामरागड यांचा समावेश आहे.

**१) आदिवासी उपयोजना :**

राज्य शासनाने श्री.द.म. सुकथनकर, राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि माजी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करुन समितीच्या अहवालातील शिफारशी स्विकारल्या आहेत. त्यानुसार सन १९९३-९४ पासुन सुधारीत आदिवासी उपयोजना लागू करण्यात आल्या आहेत. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ९ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यामुळे सदर लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी जनतेच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशा आशयाची शिफारस सुकथनगर समितीने केली. सदर शिफारशीनुसार टप्प्या टप्प्याने ९ टक्के पर्यंत नियतव्यय उपलब्ध करुन दयावयाचा होता. त्याप्रमाणे टप्प्या टप्प्याने प्रतिवर्ष नियतव्ययात वाढ होऊन सन २००५-०६ पासुन सरासरी ९ टक्के नियतव्यय उपलब्ध होत आहे.

सदर योजनांसाठी कमाल मर्यादेच्या अधिन राहुन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे जिल्हयातील अंमलबजावणी अधिका-यांकडून आदिवासी उपयोजना क्षेत्र व बाहय क्षेत्रात राबविण्याच्या योजनांचे प्रस्ताव मागवितात व संकलित प्रारुप आराखडा तयार करुन जिल्हा नियोजन मंडळापुढे मंजुरीसाठी सादर करतात.

याप्रमाणे प्रत्येक जिल्हा नियोजन मंडळाने मंजुर केलेला जिल्हानिहाय प्रारुप आराखडा संकलित करुन राज्याची जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना तयार होते. सदर योजनेत योजनानिहाय प्रस्तावित नियतव्ययास मंजुरी मिळाल्यानंतर मंजुर नियतव्यय अर्थसंकल्पीत करुन प्रत्येक विभागास मागणीप्रमाणे आदिवासी विकास विभाग तरतुद उपलब्ध करुन देते. त्याप्रमाणे संबंधित विभागाकडून मार्गदर्शक सुचनाप्रमाणे खर्च करण्यात येतो व खर्चाचा मासिक प्रगती अहवाल आदिवासी विकास विभागास सादर केला जातो.

आदिवासी विकास विभागामार्फत जिल्हास्तरीय तसेच राज्यस्तरीय योजना राबविण्यात येत आहेत. तथापी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात माहे डिसेंबर २०१० पासुन आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्रमांक टिएस्पी-२००८/प्र.क्र.६/का-६/का-६, दिनांक १६ डिसेंबर २००९ अन्वये आदिवासी उपयोजना जिल्हा वार्षिक योजना निधी अर्थसंकल्पीत करणे, वितरीत करणे व या निधीतील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतची सुधारीत कार्यपध्दती अंमलात आली आहे.

वरील शासन निर्णयान्वये सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षापासुन आदिवासी उपयोजना जिल्हास्तरीय निधी अर्थसंकल्पीत करुन, वितरीत करणे व त्यामधील कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबताच्या प्रस्तावित कार्यपध्दतीमध्ये बदल करुन यापुढे आदिवासी उपयोजनेखालील जिल्हास्तरीय निधी अर्थसंकल्पीत करणे, तरतुदीचे वितरण व प्रशासकीय मान्यता प्रदान करणे, तसेच पुनर्विनियोजन करणे इत्यादीबाबत सर्व अधिकार संबंधीत जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

आदिवासी उपयोजने अंतर्गत खालील ९ मुख्य विकासशीर्षाखाली आदिवासी जनतेकरीता वैयक्तिक लाभाच्या व क्षेत्रविकासाच्या योजना राबविण्यात येतात.

**१. कृषी व संलग्न सेवा**
**२. ग्रामीण विकास**
**३. विशेष क्षेत्रीय कार्यक्रम**
**४. पाटबंधारे व पुरनियंत्रण**
**५. विद्युत विकास**
**६. उद्योग व खनिजे**
**७. वाहतुक व दळणवळण**
**८. सामान्य आर्थिक सेवा**
**९. सामाजिक व सामूहीक सेवा**

वरील विकासशीर्षापैकी अ.नं. ९ अंतर्गत मागासवर्गीय कल्याण या उपविकासशीर्षाखाली आदिवासी जनतेसाठी वैयक्तिक व सामुहिक लाभाच्या योजना राबविण्यात येतात. अ. नं. ९ पैकी उर्वरीत विकासशीर्षा अंतर्गत शासनाची इतर विभाग वैयक्तिक व क्षेत्र विकासाच्या योजना राबवितात.

### २) केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना :

महाराष्ट्रात निरनिराळ्या क्षेत्रात राहाणा-या विविध आदिवासी जमातीच्या विकासाच्या प्रगतीमध्ये ठिकठिकाणी तफावत आहे. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील विकास कार्यक्रमाच्या गरजाही भिन्न आहेत. प्रत्येक प्रकल्प क्षेत्रातील भौगोलिक परिस्थिती आणि नैसर्गिक साधनसंपत्ती मधील विपुलता अथवा त्रुटी भिन्न असल्यामुळे ठराविक साच्याचे कार्यक्रम

सर्वच प्रकल्प क्षेत्रात आदिवासी विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरु शकणार नाही. आदिवासी विकास कार्यक्रमाच्या योजनांमध्ये स्थलकालानुरुप लवचिकता व अभिनव आणणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी आदिवासी विकासाच्या दृष्टीने सुयोग्य अशा विविध कार्यक्रमांना स्थानिक पातळीवर मंजुरीचे अधिकार प्रदान करुन सदर कार्यक्रम तातडीने कार्यान्वयीत करता यावेत याउद्देशाने न्युक्लिअस बजेट ही योजना शासनातर्फे सन १९८१-८२ या वर्षापासुन राबविली आहे. न्युक्लिअस बजेट मधील योजनांमध्ये लाभार्थींना कर्ज देणे अपेक्षित नाही.

ज्या योजना आदिवासी विकास किंवा कल्याणाच्या दृष्टीने स्थलकालानुरुप आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या स्थानिक महत्त्वाच्या योजना तांत्रिक औपचारिकतेमुळे दिर्घ कालावधीकरीता अडकून न पडता स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वयीत करुन त्यांचा लाभ गरजू आदिवासींना प्रत्यक्ष मिळवून देणे हा या योजनेचा गाभा आहे.

या निधीतुन कार्यान्वयीत करावयाच्या योजना प्रामुख्याने आदिवासी व्यक्ती / कुटुंब केंद्रबिंदू मानून त्यांचे जीवनमान वाढविण्याच्या दृष्टीने राबविल्या जातात. या योजनेमध्ये मुलभुत सोयी पद निर्मिती यावर निर्बंध आहेत.

न्युक्लिअस बजेट योजना मंजुरीसाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली निर्देश समिती शासनाने गठीत केली असुन त्यात संबंधीत विभागाचे योजना प्रस्तावित करणारे किंवा अंमलबजावणी करणारे अधिकारी सदस्य व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे सदस्य आहेत. न्युक्लिअस बजेट अंतर्गत प्रकल्प अधिकारी यांचेमार्फत राबवायच्या कर्जविरहीत योजना व त्यासाठी वापरवयाच्या निधी यासंबंधी मार्गदर्शक सुचना व आर्थिक मर्यादेत वाढ आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. न्युबयो-२०००/प्र.क्र.१४४(अ)/का.५, दिनांक ३१ मे २००१ अन्वये आर्थिक मर्यादेत वाढ व मार्गदर्शक सुचना निर्गमित केलेल्या असुन या योजनेअंतर्गत प्रत्येकी लाभार्थी आर्थिक मर्यादा रुपये १५,०००/- एवढी आहे. सदर योजनेसाठी प्रामुख्याने ४ गट पाडण्यात आले आहेत.

**अ) उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीच्या योजना : -**

या स्वरुपाच्या योजनेमध्ये सर्वसाधारणपणे शेती उत्पन्न वाढविणे, लहान लहान सिंचन योजना, पी.व्ही.सी. पाईप पुरविणे, पंपदुरुस्ती, विविध विभागामार्फत उत्पन्न निर्मित असलेल्या वैयक्तीक लाभाच्या किंवा कुंटुंबाच्या किंवा कुटुंबाच्या लाभाच्या योजनांचा समावेश होतो. सदर योजनेत लाभार्थींचा आर्थिक सहभाग असणे आवश्यक असल्याने अर्थसहाय्य देतांना अनुदानाची मर्यादा खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | **सर्वसाधारण आदिवासी लाभार्थी** | - | **८५% अनुदानाची मर्यादा** |
| २. | **आदिम जमातीचे लाभार्थी** | - | **९५% अनुदानाची मर्यादा** |
| ३. | **जेथे सहाय्य २००० पेक्षा कमी व लाभधारक दारिद्र्य रेषेखाली** | - | **१००% अनुदानाची मर्यादा** |

**ब) प्रशिक्षणाची योजना :**

या गटामध्ये आदिवासी व्यक्तींना रोजगार मिळविण्यासाठी किंवा नोकरी मिळविण्यासाठी संधी उपलब्ध होतील अशा प्रशिक्षणाच्या योजना घेण्यात येत असतात. उदा. एम.पी.एस.सी., यु.पी.एस.सी., वैद्यकीय पुर्वपरीक्षा, कॉम्प्युटर प्रशिक्षण, वाहन चालक व वाहन प्रशिक्षण व्यवसायाभिमुख्र तांत्रिक प्रशिक्षण, पोलीस दल / लष्कर भरतीपूर्व प्रशिक्षण इत्यादीचा समावेश आहे.

**क) मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना :**

आदिवासींची गुणवत्ता आणि व्यक्तिमत्व विकासाच्या विविध योजना कार्यान्वीत करुन त्यांना सुविधा, सुदृढ आणि समृध्द नागरिक बनविणे हा या योजनेमागाचा मुख्य उदेश असुन त्यात महत्वाच्या क्रीडास्पर्धा, पारंपारीक कलाकृतीचे प्रदर्शन, नृत्यकलेचे जतन व संवर्धन, उदबोधक व ज्ञानसंवंर्धन शिबीरे व मेळावे भरविणे, युवा आणि महिलांच्या रचनात्मक उपक्रमांना सहाय्य, सामूहीक विवाह अंतर्गत जोडप्यांना संसारउपयोगी वस्तुंचे सहाय्य इत्यादी प्रकारचा योजना घेण्यात येत असतात.

**ड) आदिवासी कल्याण योजना :**

आदिवासी कास्तकारांचे अडीच पॉईट दरांचे विद्युतीकरण, महिला व बाल कल्याणासाठी अभिनव उपक्रम आदिवासीवरील आपत्कालीन किंवा अत्याचार प्रकरणी अपवादात्मक विशेष परिस्थितीत तातडीने सहाय्य देणे इत्यादी योजनेचा समावेश होतो.

वर परिच्छेद ४ मध्ये उल्लेख केलेल्या ब, क, ड यात देऊ केलेले अर्थसहाय्य १००% अनुदान स्वरुपात देण्यात येते.

न्युक्लिअस बजेट योजनेअंतर्गत कार्यक्रम / योजना मंजुरीचे अधिकार खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | लाभार्थी / योजना | कमाल मर्यादा | मंजूरी देणारे सक्षम अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तीक किंवा सामूहीक लाभाच्या योजना (प्रत्येकी १५०००/- च्या अटीस अधिन राहून) | ७,५०,०००/- | अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षते खालील निर्देशन समिती |
| २ | रुपये ७,५०,०००/- पेक्षा जास्त रकमेच्या सामुहीक योजना (प्रत्येकी १५,०००/- च्या अटीस अधिन राहून) | ३०,००,०००/- | आयुक्त आदिवासी विकास विभाग |
| ३ | रुपये ३०,००,०००/- पेक्षा जास्त खर्चाच्या सामुहीक योजना (प्रत्येकी १५,०००/- च्या अटीस अधिन राहून) | -- | सचिव, आदिवासी विकास विभाग |

तसेच सन २००३-०४ या आर्थिक वर्षात अदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.न्युबयो-२००३/प्र.क्र.५५/का.५, दिनांक ७ ऑगस्ट २००३ अन्वये या योजनेअंतर्गत तरतुद वाटप ही लोकसंख्येच्या प्रमाणात

देण्यात येऊन आदिवासी लाभार्थींची निवड करतांना प्रकल्प क्षेत्रातील आदिम जमातीच्या लोकसंख्येनुसार योजनांचा लाभ देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष :**

१) महाराष्ट्रात एकूण ४७ अनुसूचित जमाती असून त्या राज्याच्या विविध विभागात विखुरलेल्या आहेत.

२) महाराष्ट्रातील ३५ जिल्ह्यांपैकी सह्याद्री प्रदेश (धुळे, नंदूरबार, जळगांव, नाशिक व ठाणे) गोंडवन प्रदेश (चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपुर, अमरावती व यवतमाळ) आदिवासींची संख्या अधिक आहे.

३) १९९३-९४ पासून सुधारीत आदिवासी उपयोजना लागू करुन राज्याच्या एकूण लोकसंखेच्या ९ टक्के आदिवासी लोकसंख्या आहे. त्यानुसार एकूण खर्चाच्या ९ टक्के खर्च आदिवासी योजनांवर केला जात आहे.

४) आदिवासी उपयोजने अंतर्गत कृषी व संलग्न सेवा, ग्रामीण विकास, विशेष क्षेत्रीय कार्यक्रम, पाटबंधारे व पूरनियंत्रण, विद्युत विकास, उद्योग व खनिजे, वाहतुक व दळणवळण, सामान्य आर्थिक सेवा या विकास शीर्षाखाली योजना राबविण्यात येतात.

५) सामाजिक व सामूहीक सेवा अंतर्गत मागासवर्गीय कल्याण या उपविकासशीर्षाखाली आदिवासींसाठी वैयक्तिक व सामुहीक लाभाच्या योजना राबविण्यात येतात.

६) ज्या योजनाचा समावेश अर्थसंकल्पात नाही अशा अभिनव स्वरुपाच्या व स्थानिक दृष्ट्या महत्वाच्या तसेच स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करुन त्याचा लाभ गरजू आदिवासींना मिळावा यासाठी केंद्रवर्ती अर्थ संकल्प (न्युक्लिअस बजेट) योजना शासनातर्फे १९८१-८२ पासून राबविली जाते.

७) केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्युक्लिअस बजेट) योजने अंतर्गत उत्पन्न निर्मितीच्या किंवा वाढीचा योजना, प्रशिक्षणाची योजना, मानवी साधन संपत्तीच्या विकासाच्या योजना व आदिवासी कल्याण योजना असे चार विभाग केले आहे.

**संदर्भ :**

१) गारे गोविंद (२००३), आदिवासी विकास योजना, आदिवासी विकास प्रतिष्ठान, पुणे.

२) वार्षिक आदिवासी विकास उपयोजना, (२००७-०८), महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग.

३) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन (२०१०-११), नाशिक

४) www.Mahartribal.com